# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वर्धा
# जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, वर्धा

Email-dpmwardha2016@gmail.com

Tender for Supply of

**"NHM, NUHM & 15th Finance"** करिता

विविध पदांची सेवा पुरविण्याकरीता बाह्यस्त्रोत संस्था निवडीबाबत.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, वर्धा

राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान व १५ व्या वित्त आयोग अंतर्गत " शहरी आयुष्मान आरोग्य मंदिर व आपला दवाखाला" तसेच इतर आरोग्य संस्थाना आरोग्य सेवा पुरविण्याच्या दृष्टीने वर्धा जिल्ह्यात नाविण्यपुर्ण योजना, राबविण्याचे प्रस्तावीत आहे.

त्याअनुषंगाने सदर योजना राबविण्याकरिता Data Entry Operator Cum Accountant – 03, Data Entry Operator – 02, Support Staff (15th Finance) Attendant & Cleaner – 72, Support Staff (NHM) Attendant & Cleaner – 19, NUHM Attendant - 02 and Cook – 2 असे एकुण १०० पदे बाहयर्यत्रणा (Outsourse) व्दारे घेण्याकरिता ई-निविदा टाकण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

करिता कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी दोन लिफाफा पध्दतीने पात्र व इच्छुक निविदाधारकांकडुन निविदा मागविण्यात येत आहे.

| Sr.No. | Name of Post | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Data Entry Operator cum Accountant | 03 | B.Com + MSCIT+1 Year Experience |
| 2 | Data Entry Operator | 02 | Any graduate with Typing Skill |
| 3 | Support Staff (NHM) – Cleaning Staff | 19 | 12 th pass |
| 4 | NUHM Attendant | 02 | 12 th pass |
| 5 | Support Staff (15th Finance) – Attendant & Cleaner | 72 | 12 th pass |
| 6 | Cook | 02 | 10 th pass |
| **Total Post** | | **100** | |

रा.आ.अ. अंतर्गत आरोग्य संस्थेकरीता वरील तक्त्यात नमुदप्रमाणे कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ पुरविण्याकरीता मान्यताप्राप्त व इच्छुक सेवा पुरवठा कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे. शासनाने या पदांकरीता मानधनापोटी अनु. क्र. १ व २ साठी Data Entry Operator & Data Entry Opertor cum Accountant १८,०००/-, (अक्षरी रु. अठरा हजार) व अनु. क्र. ३, ४, ५ व ६ या पदांसाठी Support Staff, Attendant, Cook १५,५००/- (अक्षरी रु. पंधरा हजार पाचशे) इतका दर निश्चित करुन दिलेला आहे. या दराचे अधिन राहून नियम अटींच्या पुर्ततेसह आपली ई- निवीदा वरुन दिनांक 27/12/2024 ते दिनांक 16/01/2025 वेळ सायंकाळी 5:00 pm पर्यंत किंवा त्यापुर्वी डाऊनलोड करायची आहे.

वरील प्रमाणे निविदा सोबत दिलेले निविदा अर्ज (प्रपत्र-१ (A), प्रतिज्ञा पत्र (प्रपत्र-३) व तांत्रिक लखोटयात मागणी केलेली सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रतिसह ई-निविदानुसार अपलोड करायचे आहे.

सचिव
जि.ए.आ.व कु.क.संस्था तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा

अध्यक्ष
जि.ए.आ.व कु.क.संस्था तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा

**पात्रतेचे निकष:-**

१) निविदा धारकांनी मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या आर्थिक वर्षात केलेली उलाढाल चार्टर्ड अकाऊंटंट यांचे कडुन प्रपत्र-२ नुसार प्रमाणीत करुन सादर करणे आवश्यक आहे.

२) निविदा धारकांनी मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या आर्थीक वर्षाचे ताळेबंद (Balance Sheet) प्रमाणीत करुन सादर करणे आवश्यक आहे.

३) संस्था नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४) आयकर विवरणपत्र दाखल केल्याबद्दल ITR-V (मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४) प्रमाणीत करुन सादर करणे आवश्यक आहे.

५) जी.एस.टी. सर्टिफिकेट आवश्यक आहे.

६) मागील तीन वर्षात निविदा धारकाने कंत्राटी सेवा पुरविल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र.

७) भविष्य निर्वाह निधीबाबतचे वैध रजिस्ट्रेशन.

८) ई.एस.आय.सी.वैध सर्टीफिकेट.

९) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र

१०) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन नंबर)

११) बँक सॉलवंसी प्रमाणपत्र रु.२०.०० लक्ष.

१२) निविदाधारक यांचे वार्षीक उलाढाल ही ई-निवादा रक्कमेच्या किमान ५० टक्के असणे अनिवार्य आहे. (वार्षिक ई-निविदा रक्कम अंदाजे १ कोटी ८७.५ लक्ष)

१३) व्यवसाय कर भरलेली मागील तीन महिन्याची चलान वित्तीय वर्ष (२०२३-२४).

१४) भविष्य निर्वाह निधि भरलेली मागील तीन महिन्याची चलान वित्तीय वर्ष (२०२३-२४).

१५) ISO वैध प्रमाणपत्र.

१६) निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकेलेले नाही. याबाबत निविदाधारकाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-३ ॲफिडिव्हीट/नोटरी करुन)

१७) शासनाने डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाउटंट पदाकरीता रु. १८,०००/- (अक्षरी रु अठरा हजार) सपोर्ट स्टाफ करीता प्रती माहे १५,५००/- (अक्षरी रु. पंधरा हजार पाचशे) या दराने अधीन राहुन कामगारांना मोबदला देण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदरांची असेल.

१८) काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांनी राखुन ठेवलेला आहे.

१९) EMD (अनामत रक्कम) रु. ५,६२,५००/-जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, वर्धा या नावाने भरणे अनिवार्य आहे.

District Integrated Health & Family Welfare Society, Other Wardha

Account No. - 7130630943

IFSC Code - IDIB000W020

Bank Name - Indian Bank

Branch address – Near S. T. Bus Stand, Wardha

२०) पुरवठाधारकाने पुरवठा करण्यास ईच्छूक असल्यास ज्या पुरवठाधारकाला ई-निविदा भरावयाची असल्यास फॉर्म फी / प्रक्रिया शुल्क रुपये १४,०००/- (अक्षरी रुपये चौदा हजार फक्त) (District Integrated Health & Family Welfare Society, Wardha) Other Bank Account Number Account No. – "7130630943" INDIAN BANK Branch Wardha, IFSC Code - IDIB000W020 या बँक खाते क्रमांकावर NEFT/RTGS द्वारे भरुनच ई-निविदा भरावी व पावती स्कॅन करुन ई-टेंडरमध्ये जोडण्यात यावी. अन्यथा निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही. उपरोक्त सर्व अटी मी वाचलेल्या असून त्या वाचून व समजून त्यासर्व अटी मला मान्य आहे.

२१) संस्थेचे कार्यालय किंवा शाखा हि वर्धा जिल्हात असने आवश्यक आहे. त्याकरिता करारनामा सोबत जोडण्यात यावा आहे.

२२) निविदाधारकावर फौजदारी गुन्हा दाखल झालेले नाही याबाबतचे निविदाधारकाने स्वलिखीत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**निविदा भरताना निविदाधारकांस येणाऱ्या खर्चाबाबत.**

निविदा सादर करतांना येणाऱ्या सर्व खर्चाची संपुर्ण जबाबदारी ही निविदा धारकांवर असेल. याबाबत निविदा धारकांस प्रति पुर्ति हक्क सांगता येणार नाही. तसेच सदर ची निविदा रद्द झाली अथवा निविदा धारकांची निविदा नामंजुर केली गेल्यास सदरच्या निविदे करिता झालेल्या खर्चाची जबाबदारी या कर्यालयाची राहणार नाही.

**निविदा प्रक्रियाबाबतचे स्पष्टीकरण:-**

निविदा प्रक्रियाबाबत काही शंका अथवा तक्रारी असल्यास संबंधित निविदाधारकाने अथवा निविदा भरू इच्छिणाऱ्या निविदाधारकांनी सदरची शंका अथवा तक्रार निविदा भरण्याच्या अंतिम दिनांक व वेळेच्या ३ दिवसापुर्वी या कार्यालयाकडे लेखी सादर करावी. निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदरच्या तक्रारी अथवा शंका विचारात घेतल्या जाणार नाही.

**कार्यालयाचा पत्ता:-**

जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय,
जिल्हा परिषद, वर्धा -४४२००१

**निविदा प्रक्रियेतील बदलाबाबत:-**

१) सक्षम प्राधिकारी हे निविदे मध्ये काही बदल करावयाची असल्यास सदरच्या निविदेची अंतिम दिनांक वेळेपुर्वी शुध्दी पत्रकाव्दारे बदल करु शकतात.

२) शुध्दी पत्रकाव्दारे निविदा मधील बदल हे ग्राहय मानले जातील व सदरचे बदल हे निविदेच्या अटी व शर्तीचा अधिन राहतील.

३) प्रसिध्द केलेल्या शुध्दि पत्रकामुळे निविदा सादर करण्यास अतिरिक्त कालावधी वाढविण्याचा हक्क सक्षम प्राधिकरणाने राखुन ठेवला आहे. याबाबतची माहिती अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल व ती माहिती निविदा भरू इच्छिणाऱ्यांना लागु होईल.

**निविदा सादर करण्याबाबत:-**

निविदा हया मुदतीत दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा सादर करावयाच्या आहेत. लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटा व लखोटा क्रमांक २ व्यापारी लखोटा, आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नसल्यास संबंधितांची निविदा नामंजुर करण्यात येईल.

**लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटा:-**

**निविदा धारकांनी तांत्रिक लखोटयामध्ये खालील कागदपत्रांची पुर्तता करणे बंधनकारक आहे.**

१) निविदा धारकांनी मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या आर्थिक वर्षात केलेली उलाढाल चार्टर्ड अकाउंटंट यांचे कडुन प्रपत्र-२ नुसार प्रमाणीत करुन सादर करणे आवश्यक आहे.

२) निविदा धारकांनी मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ या आर्थीक वर्षाचे ताळेबंद (Balance Sheet) सादर करणे आवश्यक आहे.

३) संस्था नोंदणी प्रमाणपत्र/शॉप अॅक्ट प्रमाणपत्र आवश्यक आहे.

४) आयकर विवरणपत्र दाखल केल्याबद्दल ITR-V (मागील तीन वर्षाचे सन २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४)

५) जी.एस.टी. सर्टिफिकेट आवश्यक आहे.

६) मागील तीन वर्षात निविदा धारकाने शासकिय/ निमशासकीय कार्यालयात कामाची कंत्राटी सेवा पुरविल्याबाबत अनुभव प्रमाणपत्र.

७) भविष्य निर्वाह निधीबाबतचे वैध रजिस्ट्रेशन.

८) ई.एस.आय.सी.वैध सर्टीफिकेट.

९) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र

१०) वैध आयकर नोंदणी प्रमाणपत्र (पॅन नंबर)

११) बँक सॉलवंसी प्रमाणपत्र रु. २०.०० लक्ष.

१२) निविदाधारक यांचे वार्षीक उलाढाल ही ई-निवादा रक्कमेच्या किमान ५० टक्के असणे अनिवार्य आहे. (वार्षिक ई-निविदा रक्कम अंदाजे १ कोटी ८७.५ लक्ष)

१३) व्यवसाय कर भरलेली मागील तीन महिन्याची चलान वित्तीय वर्ष (२०२३-२४).

१४) भविष्य निधि भरलेली मागील तीन महिन्याची चलान वित्तीय वर्ष (२०२३-२४).

१५) ISO वैध प्रमाणपत्र.

१६) निविदाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकेलेले नाही. याबाबत निविदाधारकाने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (प्रपत्र-३ ॲफिडिव्हीट/नोटरी करुन)

१७) शासनाने डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाउटंट आणि डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाकरीता रु. १८,०००/- (रु अठरा हजार) व अटेंडन्ट, क्लीनर आणि कुक या पदाकरीता रु. १५,५००/- (रु पंधरा हजार पाचशे) या दराने अधीन राहुन कामगारांना मोबदला देण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदरांची असेल.

१८) काही तांत्रिक अडचणीमुळे निविदा नाकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांनी राखुन ठेवलेला आहे.

१९) EMD (अनामत रक्कम) रु. ५,६२,५००/-जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, वर्धा या नावाने भरणे अनिवार्य आहे.

District Integrated Health & Family Welfare Society, Wardha

Account No. - 7130630943

IFSC Code - IDIB000W020

Bank Name - Indian Bank

Branch address – Near S. T. Bus Stand, Wardha

२०) पुरवठाधारकाने पुरवठा करण्यास ईच्छूक असल्यास ज्या पुरवठाधारकाला ई-निविदा भरावयाची असल्यास फॉर्म फी / प्रक्रिया शुल्क रुपये १४,०००/- (अक्षरी रुपये चौदा हजार फक्त) (District Integrated Health & Family Welfare Society, Wardha) Other Bank Account Number Account No. – "7130630943" INDIAN BANK Branch Wardha, IFSC Code - IDIB000W020 या बँक खाते क्रमांकावर NEFT/RTGS द्वारे भरुनच ई-निविदा भरावी व पावती स्कॅन करुन ई-टेंडरमध्ये जोडण्यात यावी. अन्यथा निविदा ग्राहय धरण्यात येणार नाही. उपरोक्त सर्व अटी मी वाचलेल्या असून त्या वाचून व समजून त्यासर्व अटी मला मान्य आहे.

२१) संस्थेचे कार्यालय किंवा शाखा हि वर्धा जिल्हयात असने आवश्यक आहे. त्याकरिता कारारनामा सोबत जोडण्यात यावा.

२२) निविदाधारकावर फौजदारी गुन्हा दाखल झालेले नाही याबाबतचे निविदाधारकाने स्वलिखीत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

**लखोटा क्रमांक २ व्यापारी लखोटा :-**

१) शासनाने या पदाकरिता मानधनापोटी डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाउंटंट आणि डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना प्रती कर्मचारी प्रती माह रु.१८००० (अक्षरी रु. अठरा हजार ) आणि अटेंडन्ट, क्लीनर आणि कुक या पदाकरीता रु. १५,५००/- (रु पंधरा हजार पाचशे) इतका दर निश्चित करुन दिलेला आहे. या दराचे अधीन राहुन व्यापारी लखोटा किमान नफाच्या आधारे ऑनलाईन पध्दतीने भरुन सादर करावा.

**निविदा सादर करणेविषयी अंतिम तारीख :-**

निविदा धारकांनी परिपुर्ण निविदा विहीत कालावधीत ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. तसेच सक्षम प्राधिकरणाने निविदा सादर करण्याचा कालावधी शुध्दीपत्रकाव्दारे वाढविला असल्यास अथवा बदल केलेल्या अटी व शर्ती वगळता पुर्वीच्या निविदेतील सर्व अटी व शर्ती त्याच लागु राहतील.

**लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटा उघडण्याबाबत :-**

- लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटा हा दिनांक १ डिसेंबर २०१६ रोजीच्या उद्योग उर्जा विभागाकडील शासन निर्णयातील सुचनेनुसार उघडण्यात येईल. लखोटा क्रमांक १ मधील

सर्व कागदपत्रांची जिल्हास्तरावर गठीत खरेदी समिती मार्फत तपासणी केली जाईल. तसेच समितीने घेतलेला निर्णय, अटी व शर्ती हया निविदा धारकांना बंधनकारक राहतील.

- सदरची निविदा प्रक्रिया प्रथम वेळ असल्याने लखोटा क्रमांक १ तांत्रिक लखोटयाची छाननी झाल्यानंतर स्पर्धेकरिता लखोटा क्रमांक १ चे कमीत कमी तीन लखोटे पात्र ठरले तरच सदर दिवशी (शक्य झाल्यास) लखोटा क्रमांक २ (व्यापारी लखोटा) उघडला जाईल.
- तांत्रिक लखोटयामध्ये मागणी केलेली सर्व कागदपत्रे आवश्यक आहेत. अपुऱ्या कागदपत्रांचा लखोटा अथवा चुकीची कागदपत्रे सादर केलेला लखोटा नामंजुर करण्यात येईल व याबाबत निविदा धारकांना तक्रार करता येणार नाही.

**निविदेचा वैधता कालावधी :-**

निविदेचा वैधता कालावधी तांत्रिक लखोटा उघडल्यापासुन ९० दिवसांकरिता ग्राहय मानला जाईल. ९० दिवसांपेक्षा कमी कालावधी दर्शविलेल्या निविदा रद्द करण्यात येतील. सदरच्या वैधता कालावधी या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार व परस्परांच्या संमतीने वाढविला जाईल. तो निविदा धारकास बंधनकारक राहील.

**निविदा प्रक्रियेबाबत अथवा निविदा सादर केलेल्या निविदा धारकांच्या तक्रारीबाबत.**

निविदा प्रक्रियेमध्ये निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकांवर तक्रार करणाऱ्या तक्रारदारास रु. ५,६२,५००/- इतकी अनामत रक्कम कार्यालयाकडे जमा करावी लागेल. जर तक्रारी मध्ये तथ्य आढळले तर संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करुन आरोप सिध्द झालेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रियेतुन वगळण्यात येईल व त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तक्रारीत तथ्य न आढळल्यास रुपये ५,६२,५००/- शासनखाती जमा करण्यात येत असल्याने परत मिळणार नाही.

**बयाना रक्कम:-**

१. निविदा धारकांना बयाना रक्कम ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बंधनकारक आहे.
२. नामंजुर करण्यात आलेल्या निविदाधारकांनी बयाना रक्कम समितीच्या मंजुरीनुसार परत करण्यात येईल. तसेच निविदाधारकांना बयाना रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही अथवा निविदाधारक व्याजाची मागणी करु शकणार नाही.

**बयाना रक्कम जप्त करणेबाबत.**

अ) निविदा धारक आपला वैधता कालावधीपुर्ण करण्यास असमर्थ ठरल्यास अथवा कार्यालयास याबाबत निविदा धारकांनी लेखी कळविले गेल्यास.

आ) ठेका निश्चित केलेल्या निविदा धारकाने ५००/- रुपयाचे करारपत्र न दिल्यास अथवा अनामत रक्कम कार्यालयाकडे ३० दिवसाच्या आत जमा न केल्यास बयाना रक्कम जप्त केली जाईल व त्याबाबत निविदाधारकांस तक्रार करता येणार नाही.

**निविदेचे मुल्यामापन:-**

१. गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत तांत्रिक लखोटयातील आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली जाईल.

२. निविदाधारक पात्रतेचे सर्व निकष, निविदाधारकाची ऐपत, निविदा कालावधी पुर्ण करण्याबाबतची क्षमता याबाबतची छाननी निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे समिती ठरवेल.
३. निविदाधारकांकडुन निविदा सादर करताना खोटी माहिती सादर केली आहे का अथवा सादर केलेल्या निविदाधारकांनी परस्परांच्या संगमताने सादर केल्या आहेत का याची शहानिशा समिती मार्फत केली जाईल.
४. निविदा धारकांची निविदा परिपुर्ण असणे आवश्यक आहे. अपुर्ण कागदपत्रांच्या निविदा नामंजुर करण्यात येतील व सदर च्या निविदांचा व्यापारी लखोटा उघडण्यात येणार नाही. तसेच निविदा धारक आपल्या निविदेची स्थिती संकेतस्थळावर पाहु शकतात.
५. सदर निविदेकरिता शासनाचे दर निश्चीत असल्याने किमान नफा (किमान सेवा शुल्क) पध्दतीनुसार निविदेमध्ये दर निश्चित करण्यात आलेले आहेत. यामध्ये दोन किंवा त्यापेक्षा जास्त निविदाधारकांचे दर समान आढळुन आल्यास गुणांकन पध्दतीचा वापर करुन समिती कंत्राटदराची निवड करेल ते सर्वांना बंधनकारक राहील.

**कंत्राटी सेवेची अनामतः-**

ज्या निविदाधारकांची निविदा मंजुर होईल त्या निविदाधारकाने आवश्यक अनामत रक्कम आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासुन कार्यालयाकडे ३० दिवसाच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. अनामत रक्कमेचा धनादेश/धनाकर्ष जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, वर्धा यांच्या नावे देण्यात यावा. सदरची रक्कम ही निविदा धारकांनी कार्यालयात सादर केलेल्या एकुण दराच्या ३ टक्के इतकी असेल. तसेच निविदा धारकाने रु.५००/- च्या स्टँपपेरवर करार करुन देणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने दिलेल्या कामाचा कंत्राट व्यवस्थीतरित्या पुर्ण केला नसल्यास अथवा प्राधिकारणाने/समितीने संबंधित ठेकेदाराची सेवा योग्य नसल्याबाबत कळविल्यास संबंधित कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा कंत्राट व्यवस्थीतरित्या पुर्ण केल्यानंतर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास तसेच सक्षम प्राधिकरणाने/समितीने काम समाधानकारक पुर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतर संबंधित कंत्राटदारास अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**कंत्राटदारांचे द्यावयाचा मोबदला व वेतन अदा करणेबाबतः-**

कंत्राटदारांना दरमहा देय असलेला मोबदला अनुदान उपलब्ध असल्यास दर महिन्याच्या १० तारखेस नियमानुसार जीएसटी अथवा इतर अनुषंगिक कर कपात करुन देण्यात येईल. अनुदान उपलब्ध न झाल्यास कर्मचाऱ्याचे वेतन अदा करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदारांची राहील. तसेच कामाचा मोबदला न मिळाल्यास संबंधित कंत्राटी कर्मचारी यांना या कार्यालयावर संप करण्याचा अधिकार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहील. कर्मचाऱ्यांचा दरमहा मोबदला वेळेवर अदा करुन त्यांच्या राष्ट्रीयकृत बॅंकेच्या खात्यात जमा करण्यात यावे, जमा केलेल्या मोबदला पटाची एकप्रत ८ दिवसाच्या आत कार्यालयास सादर करणे, याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच शासन सेवेत स्थाई होण्याचा कोणताही हक्क सांगता येणार नाही.

**अटी व शर्ती:-**

१. निविदाधारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर निविदाधारकांची सही व शिक्का असणे आवश्यक आहे. त्याशिवाय सदर निविदेचा विचार केला जाणार नाही.

२. संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाचे कोणतेही लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. कामावर असताना कंत्राटी कामगारास कोणतेही इजा, दुर्घटना/मृत्यु झाल्यास याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारांची राहील. त्या अनुषंगाने नियमानुसार योग्य तो विमा उतरवण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबत हे कार्यालय कोणतेही जबाबदारी घेणार नाही.

४. एकदा निश्चित झालेले दर पुन्हा वाढविता येणार नाहीत. मंजुर निविदेची मुदत निविदा मंजुर झालेल्या दिनांकापासुन पुढे तीन वर्ष (अथवा कार्यक्रम कार्यान्वित असेपर्यंत) पर्यंत राहील. सदर कालावधी संपल्यानंतर नवीन निविदा अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार दोघांच्या संमतीने हिच निविदा एक महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील नवीन निविदा होईपर्यंत चालु राहील.

५. कंत्राटदरांनी पुरविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मोबदला दरमहा १० तारखेच्या आत त्यांच्या खात्यावर ऑनलाईन जमा करावेत.

६. मंजुर निविदाधारकाने शर्ती व अटी चा भंग केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी निविदा धारकाची राहील.

७. निविदा अर्ज कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्वीकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच निविदा उघडायच्या तारखेत व वेळेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवलेले आहेत.

८. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी रुग्णालयातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधित ठेकेदरांना देय होणाऱ्या रक्कमेतुन वसुल केली जाईल.

९. मंजुर निविदेतील दर मंजुरीस्तव निविदा समितीस सादर करण्यात येईल, सदरचे दरास मंजुरी प्राप्त झाल्यानंतरच कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

१०. निविदा मंजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने रुपये ५००/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन दयावा. तसेच मंजुर झालेल्या दराप्रमाणे वर्षाला होणाऱ्या खर्चाच्या ३ टक्के रक्कम सेक्युरीटी (अनामत रक्कम) म्हणुन जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, वर्धा यांचे नावे धनादेश/धनाकर्ष व्दारे जमा करावी. कंत्राटदाराने त्याला दिलेल्या कामाचा कंत्राट त्यांनी व्यवस्थित रित्यापुर्ण केल्यानंतर व संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई अगर नुकसान भरपाई नसल्यास संबंधित कंत्राटदारास सेक्युरिटी डिपॉझिट (अनामत रक्कम) परत करण्यात येईल.

११. प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही निविदा काही कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांनी राखुन ठेवलेला आहे.

१२. पदांच्या संख्येत वाढ किंवा घट यांची अस्तित्वात असलेली कामगार कायदयांची अंमलबजावणी करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१३. कामगाराच्या तक्रारीच्या दृष्टीने सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय [illegible] कामगार न्यायालय यांचेकडुन काही दंड आकारण्यात आल्यास ती दंडाची रक्कम कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल.

**सचिव**
**जि.ए.आ.व कु.क.संस्था तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद वर्धा**

**अध्यक्ष**
**जि.ए.आ.व कु.क.संस्था तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वर्धा**

प्रपत्र-१ (A)

# निविदा अर्ज

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वर्धा

**विषयः- कंत्राटी कर्मचारी सेवा पुरविणे या कामाची निविदा अर्ज सादर करणेबाबत.....**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार मी सर्व आवश्यक ती कागदपत्रे तपासुन निविदेसोबत सादर करीत आहे (तांत्रिक लखोटयात मागणी केल्याप्रमाणे) खाली सही करणाऱ्याला निविदेतील सर्व अटी व नियम माहिती असुन त्या सर्व नियम व अटी आम्हाला बंधनकारक असुन त्या आम्हाला मान्य आहेत. निविदेतील सर्व अटी व शती वाचुन आम्ही वरील विषयांकित सेवा पुरविणे या कामाची निविदा सादर करित आहे. जर खाली सही करणाऱ्यांची निविदा मंजुर झाली तर निविदेत स्पष्ट केले प्रमाणे कामाचे स्वरुप व व्याप्तीप्रमाणे तसेच सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे सेवा देण्यास मी/आम्ही बांधिल राहु व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही.

जर खाली सही करणाऱ्यांची निविदा मंजुर करण्यात आली तर आम्हांस निविदेतील नियमाप्रमाणे देय असलेली अनामत रक्कम (निविदाधारकांने सादर केलेल्या एकुण वार्षीक दराच्या ३ टक्के) १५ दिवसात देणे आम्हांस बंधनकारक आहे व सदर बाबतीत आमची तक्रार असणार नाही. आम्हास निविदेच्या कालावधी मध्ये तसेच निविदेमध्ये नमुद केलेल्या दरांप्रमाणे व कामाचे स्वरुप व व्याप्तीनुसार सेवा पुरविणे आम्हांस बंधनकारक राहील. सदरच्या कालावधीकरिता खालील सही करणार हे सर्व नियम व अटीनुसार सेवा पुरविणेस बांधिल राहतील. जो पर्यंत अंतिम निविदा तयार होऊन ती परस्परांच्या संमतीने कार्यान्वित होत नाही तोपर्यंत आपण (निविदा स्विकारणारे) सदरच्या प्रक्रियेस बांधील नाही. तसेच खालील सही करणाऱ्यांना हे माहिती आहे की सदर निविदा प्रक्रिया होत नाही तो पर्यंत तुम्ही (निविदा स्विकारणारे) बांधिल नसुन तुम्ही अन्य कोणत्याही निविदा स्विकारु अथवा नाकारु शकतात.

**दिनांकः- / /२०२४**

**निविदाधारकाची सही व शिक्का**

## प्रपत्र-२

## ANNUAL TURN OVER STATEMENT FOR PAST THREE YEARS

The Annual Turn over of M/s.........................................................................................................for the post three years are given below and certified that the statement is true and correct.

| Sr. No. | Year | Turn Over Rs. In Crores |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |

**Date:**

**Seal**

**Signature of Auditor/Chartered Accountant**

**Name (in capital letters)**

# प्रपत्र-३

## प्रतिज्ञापत्र

मा. कार्यकारी दंडाधिकारी, तह..............................जि....................यांचेसमोर प्रतिज्ञापत्र लिहुन देणार........................वय...........धंदा....................पत्ता.........
..........................................................................................................

मी सत्य प्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करतो की, मी वरील पत्यावरचा कायमचा रहिवासी असुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. वर्धा यांचे अधिनस्त जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी वर्धा करिता कंत्राटी कर्मचारी सेवा पुरविणे या कामाचे निविदा भरलेली असुन सदरच्या निविदेत नमुद केलेले दर देय असणाऱ्या वेतनानुसार असेल तसेच सदरचे वाढीव दर झाल्यास माझी निविदा नामंजुर करण्यात येईल, याची मला कल्पना आहे व याबाबत माझी कोणतीही तक्रार असणार नाही.

मी शासकीय, निमशासकीय कामे घेतली असुन मी ज्या ज्या ठिकाणी कामे घेतलेली आहेत ती कामे व्यवस्थितरित्या पुर्ण केलेली आहेत. आजपर्यंत कोणतेही काम अपुरे सोडलेले नाही. यामुळे अथवा इतर कारणांमुळे शासनाच्या कुठल्याही विभागामध्ये माझे नाव काळया यादीमध्ये नाही. ही वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. माझेवर फसवणुक, अफरातफर, दंडदोष, गुन्हयाची नोंद नाही. तसेच मला कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्हयाखाली शिक्षा केलेली नाही.

तांत्रिक लखोटयामधील (लिफाफा क्र.१) निविदेमध्ये प्रसिध्द केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे मी सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रे अपुर्ण अथवा चुकीची असल्यास माझी निविदा नामंजुर करण्यात येईल याची मला कल्पना आहे व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच मी शासनाच्या कुठल्याही काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याबाबत व माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा नोंद नसल्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांच्या नावाने प्रतिज्ञापत्र लिहुन देत आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असुन सत्य आहे ती खोटी आढळल्यास मी भारतीय दंड विधान संहितेतील कलम १९९, २०० व १९३ (२) नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र राहील. म्हणुन केले सत्यप्रतिज्ञेवर केलेले ॲफिडेव्हीट आज दिनांक..................रोजी ठिकाण............
.......येथे सादर करत आहे.

**दिनांक : / /२०२४**

**निविदा धारकाची सही व शिक्का**